## प्रकरण सहा

## उपसंहार

राजर्षि शाहू महाराजांची दोन-अडीच दशकांची कारकीर्द कोल्हापूरच्या इतिहासात एक पराक्रमी, पुरोगामी व आधुनिक पर्व ठरले. सामाजिक ऐक्य, समता, मागासवर्गियांना दरबारी सेवेत राखीव जागा, व्यापारात उत्तेजन, मल्लविद्यां सारख्या परंपरागत मर्दानी खेळास भरीव, व्यापक प्रोत्साहन, त्याचबरोबर नाटक, पोवाडे, तमाशा, गायन या परंपरागत मनोरंजनाच्या माध्यमांना राजाश्रय ही कांही ठळक वैशिष्ठये ठरावित. त्यांच्या कारकिर्दीत सर्वांगीण प्रगती झाली. त्यांच्याच कारकिर्दीत सर्वसामान्यत: दुर्लक्षित राहिलेले एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे कोल्हापूरातील चित्रपट निर्मितीचा प्रारंभ हे होय.

चित्रपटाच्या माध्यमातून मनोरंजनाच्या क्षेत्रात पाश्चिमात्य देशात क्रांती घडू पहात होती. चित्रपटाच्या रुपाने दृकश्राव्य माध्यमाची एक मोठी देणगी विज्ञानाने मानवास दिली. चित्रपटाने मनोरंजनाच्या क्षेत्रात एका नवीन विश्वाचा प्रारंभ केला. प्रथम चित्रपट निर्मितीचे श्रेय अमेरिकेच्या एडवीन एस्. पोर्टर यांना जाते. १९०३ मध्ये त्यांनी " द ग्रेट ट्रेन रॅाबरी " हा चित्रपट प्रदर्शित केला.[१] भारतात हा मान नासिकच्या दादासाहेब फाळकेंकडे जातो. त्यांनी मुंबई येथे १९१३ साली " राजा हरिश्चंद्र " या चित्रपटाची निर्मिती केली.[२] कोल्हापूरातही याच दरम्यान आनंदराव मेस्त्री व बाबुराव पेंटर या व्यक्ति चित्रपट निर्मितीच्या प्रयत्नात होत्या. त्यात बाबूराव पेंटर यशस्वी झाले व त्यांनी १९१७ मध्ये स्थापन केलेल्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " ला १९१९ मध्ये " सैरंध्री " च्या रूपाने कोल्हापूर संस्थानात पहिला चित्रपट निर्माण करण्याचा मान मिळाला. [३] छ. शाहूंच्या कारकिर्दीतील अंतीम टप्प्यात मनोरंजन क्षेत्रात नवीन दालन उघडणा-या एका कलाविष्काराचा प्रारंभ झाला.

चित्रपटांचा अभ्यास करताना चित्रपट विकासाचा मागोवा मूकपट, बोलपट व रंगीत चित्रपट अशा टप्प्याटप्प्याने घेता येतो. चित्रपटाच्या प्रारंभी मूकपटाच्या काळात कोल्हापूरपुरता विचार करता १९१९ ते १९३२ हा मूकपटाचा काळ ठरतो. १९१९ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने " सैरंध्री " हा पहिला मूकपट तर याच संस्थेने १९३२ मध्ये " किस्मत " हा शेवटचा मूकपट सादर केला. [४] या दरम्यान एकूण तीस मूकपट सादर झाले. जास्तीत जास्त म्हणजे तेथीस चित्रपट काढण्याचे श्रेय याच संस्थेला जाते. या व्यतिरिक्त १९२९ मध्ये व्ही. शांताराम, दामले, धायबर, फत्तेलाल व कुलकर्णी यांनी " प्रभात फिल्म कंपनी " ची स्थापना केली, व या संस्थेने " गोपालकृष्ण ", " रानीसाहिबा ", " खुनी खंजीर ", " उदयकाल ", " चंद्रसेना ", " जुलूम " या सहा मूकपटांची निर्मिती केली. [५] याच दरम्यान १९३१ मध्ये " आनंद फिल्म कंपनी " ने " प्रेमसंगम " या मूकपटाची निर्मिती केली. [६] याच चित्रपटाचे १९३४ साली बोलपटात रूपांतर केले गेले.

मूकपटाचा पुढील विकसित टप्पा म्हणजे बोलपट. भारतात बोलपटाचे युग " आलमआरा " याद्वारे मुंबई " इंपिरियल फिल्म कंपनी " ने १९३१ ला आणले. [७] कोल्हापूर चित्रपटसृष्टीची मुंबईबरोबर वाटचाल सुरू होती. तेथे १९३१ साली तर इथे त्यानंतर एका वर्षातच बोलपटाचा काळ सुरू झाला. त्याचे श्रेय " प्रभात फिल्म कंपनी " च्या १९३२ च्या " अयोध्येचा राजा "

या बोलपटास जाते.[८] १९३२ ते १९४९ या काळात कोल्हापूरातील विविध संस्थांनी कोल्हापूर येथे चव्वेचाळीस मराठी बोलपटांची निर्मिती केली. " प्रभात " ने " अयोध्येचा राजा " धरून जवळजवळ पाच बोलपट निर्माण केले. या काळात अधिक बोलपट निर्माण करण्याचे श्रेय १९३६ मध्ये स्थापन झालेल्या " हंस पिक्चर्स " या संस्थेला जाते. बाबूराव पेंढारकर यांनी पुढाकार घेऊन सुरु केलेल्या या संस्थेने कोल्हापूर येथे प्रेमवीर, अर्धांगी, देवता, सुखाचा शोध, ज्वाला, ब्रम्हचारी, ब्रॅण्डीची बाटली या सात बोलपटांची निर्मिती केली. या व्यतिरिक्त कोल्हापूरात " छत्रपती सिनेटोन ", " कोल्हापूर सिनेटोन ", " शालिनी सिनेटोन ", " प्रभाकर पिक्चर्स ", " न्यू हंस पिक्चर्स ", " मंगल पिक्चर्स ", " प्रभा चित्र ", " प्रिन्स शिवाजी प्रॅाडक्शन ", " माय पिक्चर्स ", " शाम सिनेटोन ", " प्रगती पिक्चर्स ", " महाराष्ट्र पिक्चर्स ", " प्रफुल्ल पिक्चर्स ", " सम्राट सिनेटोन ", " राष्ट्र सिनेटोन " या संस्थांनी चित्रपट निर्मिती केली.

या काळातील कोल्हापूर संस्थानातील सामाजिक जीवनाचा विचार करता, एकीकडे सत्यशोधक चळवळीची तीव्रता कमी झाल्याचे दिसते, तर दुसरीकडे सर्वसामान्य दलितांना आपल्यावर परंपरागत होणा-या अन्याया - विरुध्दची तसेच आपल्या हक्कांविषयी व्यापक जाणीव झालेली दिसते. या अन्यायाविरुध्द आणि हक्कांकरीता त्यांनी व्यापक चळवळ उभारली. हेच सामाजिक चळवळीचे वैशिष्टय ठरावे. याच काळात भरीव शैक्षणिक प्रगती होऊन साक्षरतेचे प्रमाण वाढले. वृत्तपत्रांचा विकास झाला. दलितांनी वृत्तपत्र माध्यमातून आपल्यावरील सामाजिक अन्यायाविरुध्द व आपल्या हक्कांकरीता वैचारिक लढा पुकारला. उदा. माधवराव कुरणे यांनी अस्पृश्यांच्यात स्वाभिमान जागृत करण्यासाठी व डॅा. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार

करण्याच्या उद्देशाने " दलित निनाद " हे साप्ताहिक सुरू केले. [९] तत्कालीन वृत्तपत्रांत सामाजिक बदलाचे जेवढे प्रतिबिंब पडले, तेवढ्या प्रमाणात चित्रपट माध्यमात ते पडले नाही. या काळात निर्माण झालेल्या १९ चित्रपटात सामाजिक प्रश्नांची हाताळणी होती. मुख्यत: विवाहाच्या समस्यांची - उदा. " देवता " चित्रपटात प्रौढ विवाहाची समस्या हाताळली होती. [१०] तर " छाया ", " प्रेमवीर " या चित्रपटातून गरीब-श्रीमंत भेदाधारीत समस्या होत्या. [११] पण हिंदू समाजाला ग्रासलेल्या बालविवाहासारख्या समस्या किंवा समाजसुधारकांनी उचलून धरलेल्या विधवा विवाह, पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह यावर आधारीत चित्रपट निघाले नाहीत.

गरीब शेतक-यांवर होणा-या अन्यायाविरुध्द वाचा फोडण्याचा प्रयत्न बाबूराव पेंटर यांनी " सावकारी पाश " या चित्रपटाद्वारे केला. [१२] तर संस्थानच्या राज्यकारभारावर टीका करणारा चित्रपट निर्माण झाला नसला तरी, ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेवर होणा-या अन्यायाचे दर्शन, व्ही. शांताराम यांनी " जुलूम " चित्रपटाद्वारे घडविले. [१३]

तत्कालीन सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी जरी या चित्रपटात नसली तरी " संत दामाजी ", " धर्मात्मा " या संत कथांवर आधारीत चित्रपटातून व्ही. शांताराम, बाबूराव पेंढारकर, बाबूराव पेंटर यांनी अस्पृश्योध्दाराच्या विषयास हात घातला. [१४] तर " तारा पिक्चर्स " चे संचालक बाळासाहेब पाटील यांनी १९४९ मध्ये महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवनावर चित्रपट काढण्याचा प्रयत्न केला, हे विशेष. [१५] मात्र हा चित्रपट कोणत्या कारणांमुळे चित्रित होऊ शकला नाही, याचा उल्लेख सापडत नाही.

चित्रपट विश्व आणि समकालीन राजकीय परिस्थितीचा आढावा घेता असे दिसते की, कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषदेच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या स्वातंत्र्य चळवळीवर आधारीत चित्रपट निघाले नाहीत. कारण अशा चित्रपटांना अभ्यवेक्षण मंडळाकडून अनुमती मिळणे अशक्य होते. कोल्हापूरातील चित्रपट निर्मात्यांनी असा चित्रपट काढण्याचा प्रयत्न केला हे महत्वाचे. या संदर्भात बाबूराव पेंढारकर व भालजी पेंढारकर यांच्या " वंदे मातरम् आश्रम " या चित्रपटाचा उल्लेख करता येईल. मुंबई येथे १९२७ साली निघालेला हा चित्रपट राजकीय अथवा स्वातंत्र्य चळवळीवर आधारीत नसला तरी, लाला लजपतराय व पं. मदनमोहन मालवीय प्रेरीत राष्ट्रीय शिक्षणाच्या विषयावर आधारीत होता. स्वाभाविकत: यातील अनेक दृश्ये व संवादांना अभ्यवेक्षण मंडळाने आक्षेप घेऊन मोठया प्रमाणात काटछाट केली गेली.[१६] १९४८ मध्ये " नवा झंकार चित्र " या संस्थेच्या " वंदे मातरम " या चित्रपटात स्वातंत्र्य चळवळीतील बलिदानाची कथा मांडण्यात आली होती. या चित्रपटाचे चित्रिकरण कोल्हापूरातील " शालिनी सिनेटोन " येथे झाले.[१७]

स्वातंत्र्य चळवळीचे समर्थन करणारे चित्रपट काढणे शक्य नसले, तरी या महत्वाच्या आशयाकडे चित्रपट निर्मात्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले असे मात्र म्हणता येणार नाही. त्यांनी समकालीन राजकीय घटनांवर अथवा महात्मा गांधी प्रणित स्वातंत्र्य चळवळीवर चित्रपट काढले, नसले तरी शिवाजी महाराजां-सारख्या राष्ट्र पुरुषांवर ज्यांच्या जीवनापासून अनेक राष्ट्रभक्तांनी प्रेरणा घेतली, चित्रपट काढून कोल्हापूरातील चित्रपट निर्मात्यांनी कांही अंशी अप्रत्यक्षरित्या का होईना पण या विषयास न्याय दिला आहे. या चित्रपटात " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " सिंहगड ", " शहाला शह ", " कल्याण खजिना ", " प्रभात फिल्म कंपनी " च्या " उदयकाल ", " सिंहगड " व

" प्रभाकर पिक्चर्स " च्या " जय भवानी ", " शिलंगणाचं सोनं " अशा अनेक चित्रपटांचा उल्लेख करावा लागेल. [१८]

चित्रपट हे नविन माध्यम असल्याने त्याचा विकास मुख्यत: शहरी भागात झाल्याने शहरी, सुशिक्षित व मध्यमवर्गीय प्रेक्षकांना डोळयासमोर ठेवून चित्रपट निर्मिती झाली. राजकीय, सामाजिक चळवळ जशी शहरापुरती मर्यादित होती, तसेच कांहीसे चित्रपटांबाबतीतही घडले.

बहुतांशी चित्रपट हे धार्मिक, पौराणिक, संत कथांवर आधारीत होते. चित्रपटांच्या व्यावसायिक यशावर नजर ठेवून हे घडले असावे. सर्वसामान्यांवर धर्म, पुराण, रामायण, महाभारत यांचा प्रभाव असल्याने या विषयाधारित चित्रपटांकडे मोठया प्रमाणात दर्शक आपोआपच आकर्षित झाले. तसेच सदर विषय मांडताना चमत्कृती दृश्यांना [ ट्रिक सिन्स ] वाव होता. तांत्रिक व वैज्ञानिक प्रगतीमुळे अशा प्रसंगाचे रोमहर्षक चित्रिकरण करणे साध्य झाले. परिणामत: मनोरंजनात एका नव्या पैलूची भर पडली. राम, कृष्ण, भीम, अर्जून यांच्या परिचित कथा नवीन माध्यमाद्वारे पाहण्याची संधी सर्वसामान्यांना मिळाली. त्याचप्रमाणे " सिंड्रेला ", " जादुगारिण " सारख्या चित्रपटात अद्भूतरम्य चमत्कृती दृश्यांना वाव असल्याने निर्मात्यांनी अशा मनोरंजनाला पूर्ण वाव देणा-या कथा हाताळल्याचे दिसून येते.

चित्रपट निर्मिती ही खर्चिक बाब आहे. ती मोठी आर्थिक गुंतवणूक आहे. चित्रपट व्यवसायामुळे आर्थिक गुंतवणूकीस नविन क्षेत्र उपलब्ध झाले. प्रारंभीच्या काळात चित्रपटाचे व्यावसायिक यश अनिश्चित असल्याने आर्थिक गुंतवणूकीस सहसा कोणी तयार नसे. एवढया मोठया प्रमाणात भांडवल गुंतवून ठेवणे अवघड होते तरी, कोल्हापूरात अनेकांनी हे धाडस केले. स्वभांडवलावर

चित्रपट निर्मिती प्रयत्न राजाराम महाराज यांनी केला. त्यांनी १९३३ मध्ये कोल्हापूर सिनेटोन ची स्थापना केली व " आकाशवाणी ", " विलासी ईश्वर " इत्यादी सारख्या चार चित्रपटांची निर्मिती केली.[१९] राज - घराण्यातील आक्कासाहेब महाराज यांनी " शालिनी सिनेटोन " स्थापन करून " प्रतिभा ", " उषा " इ. चार चित्रपट निर्मिले.[२०]

राजेशाहीत राजापासून प्रोत्साहन घेऊन राजाचे अनुकरण ब-याचदा केले जाते. छत्रपतींनी चित्रपट निर्मिती केल्यावर दरबाराशी निगडीत मेजर दादासाहेब निंबाळकर हेदेखील या क्षेत्रात उतरून " प्रिन्स शिवाजी सिनेटोन " ची स्थापना केली व त्याद्वारे " स्वराजाच्या सिमेवर " या चित्रपटाची निर्मिती केली.[२१]

राजदरबाराला आर्थिक गुंतवणूक करणे शक्य होते. त्यांच्या व्यतिरिक्त स्वभांडवलावर चित्रपट निर्मितीचा प्रयत्न डी.जी. वणकुद्रे यांनी केला. ते व्यापारी घराण्यातील असल्याने ही गोष्ट शक्य झाली. " सम्राट सिनेटोन " तर्फे त्यांनी " नागानंद " चित्रपट काढला.[२२]

वरील अपवाद वगळता चित्रपट निर्मिती भागीदारी तत्वावरच झाली. येथील पहिला मूकपट " सैरंध्री " ची निर्मिती तानीबाई कागलकर यांच्या आर्थिक मदतीने झाली.[२३] त्यावेळी चित्रपट निर्मिती खर्च सर्व-साधारण दहा हजार रुपये येई. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने काढलेले चित्रपट भागीदार घेऊनच काढले. चित्रपट निर्मिती खर्च वाढत गेला, त्यानुसार भागीदारांची संख्या देखील वाढत गेली. " प्रभात फिल्म कंपनी " ची स्थापनाच मुळात व्ही. शांताराम, के. धायबर, दामले, फत्तेलाल व कुलकर्णी या पाच भागीदारांनी केली.[२४] बाबूराव पेंढारकरांनी देखील भागीदारी

तत्वावरच चित्रपट निर्मिती केली.

चित्रपट निर्मितीचा खर्च चाळीसच्या दशकाच्या शेवटी एक लाख रुपयापर्यंत गेला.[२५] यातील मोठा भाग चित्रिकरण, चित्रफित, रासायनिक प्रक्रिया, डेव्हलपिंग सारख्या प्रक्रिया यावर खर्च होत असे. छायाचित्रक व इतर तत्सम खर्चदेखील अधिक असे. १९२२ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने छायाचित्रकाकरीता सात हजार रुपये खर्ची टाकले [२६] होते. महागडा छायाचित्रक परवडणे अवघड असल्याने " प्रभात " ने तीन हजार रुपयात जुना छायाचित्रक घेऊन निर्मितीस प्रारंभ केला.[२७] तसेच प्रारंभी रंगीत चित्रपटाच्या प्रक्रियेची सोय इथे नसल्याने परदेशातून ते करुन घ्यावे लागले. तत्संबंधी खर्चाची निश्चित आकडेवारी नसली तरी खर्चाचे प्रमाण मोठे होते.

तंत्रज्ञ व कलाकार यांच्या मानधनात सुध्दा बराच खर्च येत असे. प्रारंभीच्या काळात मानधन निश्चित नव्हते. ब-याचदा ते दिले जात नसे. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने काढलेल्या पहिल्या दोन चित्रपटातील कलाकार व तंत्रज्ञांना कोणतेच मानधन देण्यात आले नाही.[२८] पण चित्रपटाची व्यवसाय म्हणून प्रगती होत गेली, कलावंत प्रसिध्दीच्या झोतात येत गेल्याने मानधन वाढत गेले. १९२० मध्ये मुख्य अभिनेत्री वीस - पंचवीस रुपये मानधन म्हणून घेत असे, तर १९२४ साली "कल्याणचा खजिना" चित्रपटाकरीता जुबेदाने पाचशे रुपये घेतल्याचा उल्लेख सापडतो.[२९] " अयोध्येचा राजा " करीता १९३२ मध्ये दुर्गा खोटे यांनी अडीच हजार रुपये घेतले.[३०] बाबूराव पेंढारकरांनी १९४७ मध्ये प्रदर्शित झालेल्या " मंगल पिक्चर्स " च्या " जय मल्हार " चित्रपटातील भूमिकेसाठी दहा हजार रुपये घेतल्याचा उल्लेख आढळतो.[३१] प्रसिध्द दिग्दर्शक अनंत माने यांचा चित्रपट क्षेत्रातील प्रारंभ

१९३० मध्ये " प्रभात फिल्म कंपनी " च्या रसायन शाळेत झाला. प्रारंभी त्यांना कामाचा मोबदला मिळाला नाही. पण दीड वर्षानंतर त्यांना पगाराच्या स्वरुपात दहा रुपये, त्यानंतर दोन वर्षांनी एकोणीस रुपये अशा रितीने पगारात वाढ होऊ लागली. [३२] चित्रपट निर्मितीत मोठा खर्च म्हणजे कलाकार व तंत्रज्ञांवरील खर्चदेखील वाढत गेला.

चित्रपट क्षेत्रातील आर्थिक गुंतवणूक लाभदायी असल्याने मोठया प्रमाणात व्यापारी व इतर व्यावसायिकांना गुंतवणूकीचे नवीन क्षेत्र मिळाले. चित्रपटातील गुंतवणूक ही मोठी जोखीम होती. चित्रपटाच्या व्यावसायिक यशावर गुंतवणूकीची मदार अवलंबून होती व यशाची खात्री देणे शक्य नव्हते. चित्रपट अयशस्वी ठरल्याने मोठा आर्थिक फटका बसून " सम्राट सिनेटोन " सारखी संस्था बंद पडली. [३३] याउलट चित्रपट निर्मितीचे विशेष व व्यावसायिक ज्ञान असणा-यांची गुंतवणूक यशस्वी ठरुन ते निगडीत असलेल्या चित्रपट संस्था यशस्वी झाल्या.

यशस्वीतेचे मुख्य गमक म्हणजे व्यावसायातील गमक. यासाठी चित्रपटाचे प्रकाशन हा तितकाच महत्वाचा भाग असून निर्मात्यास चित्रपटाच्या प्रकाशना-करीता व वितरणाकरीता दुस-यावर अवलंबून रहावे लागे. त्यामुळे निर्मात्याचे उत्पन्न कमी होई. चित्रपटाच्या उत्पन्नाच्या केवळ वीस टक्के रक्कम निर्मात्यांना मिळे. " महाराष्ट्र फिल्म कंपनी ", " कोल्हापूर सिनेटोन " इ. संस्थांनी स्वत:ची वितरण व्यवस्था सुरु करुन दुसरीकडील लाभाचा ओघ स्वत:कडे वळविला. [३४] " हंस पिक्चर्स " ने देखील " पिअरलेस पिक्चर्स " नावाची प्रकाशन संस्था सुरु करुन चित्रपटातील व्यावसायिक यश मिळविले. [३५] याशिवाय चित्रपटगृहाच्या चालकाकडूनदेखील उत्पन्नाचा ठराविक भाग घेऊन चित्रपट संस्था स्वत:चा चित्रपट प्रदर्शित करीत असत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

चित्रपट व्यवसायात गुंतवणूकीवर लाभ मोठया प्रमाणात होई. प्रारंभी वीस हजार रुपये गुंतवणूक असेल तर होणारा लाभ ऐंशी-नव्वद हजार रुपयापर्यंत असे.[३६] सर्वसाधारण हेच प्रमाण या काळात राहिले. पण व्यावसायिकदृष्टया यशस्वी होणा-या चित्रपटांना हा लाभ होत असे. या क्षेत्रातील व्यावसायिक ज्ञान, अनुभव व विशेष माहिती नसताना ज्यांनी आर्थिक लाभाकरीता गुंतवणूक केली, त्यांच्या पदरी निराशा पडली. या संदर्भात " सम्राट सिनेटोन " सारखी उदाहरणे देता येतील. पण " महाराष्ट्र फिल्म कंपनी ", " हंस पिक्चर्स ", " प्रभात फिल्म कंपनी " यासारख्या संस्थांना मोठया प्रमाणात व्यावसायिक यश लाभले.

कोल्हापूरातल्या चित्रपट निर्मात्यांनी केवळ मराठीतच चित्रपट निर्मिती केली असे नाही, तर हिंदी, तामिळ, तेलगू या भाषांतील चित्रपट देखील सादर केले. उदा. १९३५ साली " शालिनी सिनेटोन " ने "राजमुगुट"[३७] तर १९४४, १९४५, १९४६ साली " प्रभाकर पिक्चर्स " ने अनुक्रमे " महारथी कर्ण ", " सुवर्णभूमी " व " वाल्मिकी " या हिंदी चित्रपटांची निर्मिती केली.[३८] " प्रफुल्ल पिक्चर्स " ने १९४५ साली " बडी माँ " हा हिंदी चित्रपट सादर केला.[३९] हिंदी व्यतिरिक्त तामिळ भाषेतील चित्रपटात " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ साली " सीता कल्याणम " हा चित्रपट काढला.[४०] तेलगू भाषेत " कोल्हापूर सिनेटोन " ने १९३५ साली " द्रौपदी वस्त्रहरण " या चित्रपटाची निर्मिती केली.[४१] मराठी चित्रपटात इंग्रजी भाषेतील गाणे घालण्याची सुरुवात " कोल्हापूर सिनेटोन " च्या " विलासी ईश्वर " चित्रपटापासून झाली. " पफ-पफ-पफ द इंडियन लेड " हे गाणे सदर चित्रपटात होते.[४२]

याचबरोबर मुंबई, पुणे या इतर शहरातल्या चित्रपट निर्मात्यांनी आणि मद्रासासारख्या परप्रांतीय शहरातील निर्मात्यांनी देखील येथे चित्रपट निर्मिती केली असे दिसून येते. मुंबईच्या " प्रदीप पिक्चर्स " या " सावळ्या तांडेल " हा ऐतिहासिक चित्रपट १९४२ साली कोल्हापूरातील शालिनी चित्रपट निर्मितीगृहात चित्रित झाला.[४३] तर " अत्रे पिक्चर्स ", मुंबई या संस्थेचा " वसंतसेना " हा चित्रपटही १९४२ साली याच चित्रपट निर्मिती-गृहात चित्रित केला गेला. १९४८ साली पुण्याच्या " नवा झंकार चित्र " या संस्थेचा " वंदे मातरम् " हा चित्रपटही येथेच चित्रित झाला.[४४] परप्रांतीय चित्रपट संस्थातील मद्रासच्या " स्टार कार्पोरेशन " चा " राजा हरिश्चंद्र " हा तेलगू चित्रपटही १९३५ साली कोल्हापूरच्या " शालिनी चित्रपट निर्मितीगृहात चित्रित केला.[४५]

कोल्हापूरातील चित्रपट निर्मात्यांनी पुणे व मुंबई या ठिकाणी चित्रपट संस्था स्थापन करून चित्रपट निर्मिती केल्याची उदाहरणे आढळतात. बाबूराव पेंढारकर व भालजी पेंढारकर यांनी मुंबई येथे " वंदे मातरम् " या चित्रपट संस्थेची स्थापना करून १९२६ साली " वंदे मातरम् " या चित्रपटाची निर्मिती केली.[४६] तर मा. विनायक, बाबूराव पेंढारकर, प्र. के. अत्रे यांनी पुणे येथे " नवयुग चित्रपट लिमिटेड " या चित्रपट संस्थेची १९४० ला स्थापना केली.[४७] भालजी पेंढारकरांनी देखील " फेमस आर्ट्स पिक्चर्स " ची इतर भागीदारांसोबत पुण्यात स्थापना करून चित्रपट निर्मिती केली.[४८] अशा रितीने येथील निर्मात्यांनी इतर ठिकाणी देखील या क्षेत्रात आपला ठसा उमटविलेला दिसतो.

चित्रपटसृष्टीत समाजातील एखाद्या ठराविक जातीचे अथवा वर्गाचे

योगदान नव्हते. बाबुराव पेंटर हे सुतार, भालजी पेंढारकर व बाबूराव पेंढारकर हे ब्राम्हण, बाळासाहेब यादव व झुंझारराव पवार हे मराठा, सुर्यकांत मांडरे हे शिंपी, व्ही. शांताराम व व्ही. अवधूत हे जैन, फत्तेलाल व शमीम भगत हे मुसलमान, अशा अनेक जाती-धर्माचे लोक या व्यवसायात गुण्या-गोविंदाने काम करीत होते. [४९] त्यामुळे चित्रपटाने फक्त मनोरंजनच नाही तर धर्म, जात, गरीब-श्रीमंत या भेदांच्या मर्यादा मोडून काढणा-या एका नविन विश्वाची निर्मिती झाली यातच या नविन माध्यमाचे वैशिष्टय व महत्व सामावलेले आहे. या क्षेत्रात चित्रपट सोडून इतर व्यवसायातील लोकही हौस व आवड म्हणून भाग घेऊ लागले होते. उदा. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " कल्याण खजिना " या १९२४ साली निघालेल्या चित्रपटात बेदी या तरूण पंजाबी व्यापा-याने काम केले होते. [५०] इतर व्यवसायातील लोकांना देखील चित्रपटसृष्टीचे आकर्षण वाटू लागले. होते.

कोल्हापूरचा एक सांस्कृतिक केंद्र म्हणून जो विकास झाला, त्यात राजदरबाराने दिलेला राजाश्रय खूप अंशी कारणीभूत ठरला. संगीत, गायन, पोवाडा, नाटक, मल्लविद्या या सर्वांनाच कोल्हापूरात राजाश्रय लाभला व या सर्व क्षेत्रातील व्यक्ति येथे मोठ्या संख्येने उपलब्ध होत्या. नाटकाचे नेपथ्य करणारे बाबूराव पेंटर, नाट्य व गायन क्षेत्रातील गोविंदराव टेंबे, भूर्जीखाँ यासारखे कलावंत, नाट्यलेखन व दिग्दर्शन करणारे भालजी पेंढारकर हे कलावंत चित्रपटसृष्टीत प्रवेश करू लागले. त्याचप्रमाणे कोल्हापूरात मल्ल-विद्या जोपासली गेली. अभिनयाशी निगडीत नसणा-या बाळासाहेब यादवां-सारख्या मल्लांना सुदृढ देह व चित्रपटात काम करण्याची इच्छा यामुळे चित्रपटात कामे मिळू लागली. [५१]

कोल्हापूर संस्थानात संगीत, गायन, नाटय, मल्लविद्या इत्यादीच्या विकासाचे मोठे श्रेय राजाश्रयास जाते. कोल्हापूरच्या छत्रपतींनी अनेक कलावंतांना उदार राजाश्रय दिला. चित्रपटांनासुध्दा हे लागू पडते. पण चित्रपटांच्या बाबतीत छत्रपतींची भूमिका फक्त राजाश्रयापुरतीच मर्यादित नव्हती. ते स्वत: चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात उतरले होते. भारतीय इतिहासात राजांच्या व्यापारी सहभागाची उदाहरणे फार थोडी आहेत. मराठयांच्या इतिहासात जवळजवळ नाहीतच, म्हणून राजघराण्याच्या इतिहासाचा विचार करता मुख्यत्वे कोल्हापूरच्या छत्रपतींचा विचार करता, त्यांचा चित्रपट निर्मितीत सहभाग हे वेगळेपण मानावे लागेल.

चित्रपटात प्रारंभी काम करण्यास स्त्रियां मिळणे कठीण काम होते. सहसा कोणी स्त्रियां यात काम करण्यास तयार होत नसत. श्री. दादासाहेब फाळकेंनी स्त्री कलाकार न मिळाल्याने पुरुष कलावंतालाच स्त्रीची भूमिका दिली. [५२] पण बाबूराव पेंटर यांनी मात्र स्त्री कलावंतच घेऊन चित्रपट तयार केला. [५३] तरीदेखील चित्रपटात काम करण्यास स्त्रियां मिळणे ही दुर्लभ गोष्ट होती. पण हळूहळू परिस्थिती बदलली व दुर्गा खोटे सारख्या सुशिक्षित स्त्रियांदेखील या क्षेत्रात आल्या. चित्रपटात भूमिका करणे व गायक म्हणून स्त्रियां या क्षेत्रात आल्या. तरी, निर्मितीच्या क्षेत्रात कोल्हापूरच्या आक्कासाहेब महाराज, मुंबईच्या कमलाबाई मंगरूळकर अशी तुरळक उदाहरणे आढळतात. चित्रपट लेखन, दिग्दर्शन किंवा इतर तांत्रिक विभागात या काळात स्त्रियांचा सहभाग नव्हता.

चित्रपटाला मनोरंजनाचे माध्यम म्हणून मान्यता मिळाली व या लोकप्रियतेचा लाभ वृत्तपत्रसृष्टीला देखील मिळू लागला. आपल्या वृत्तपत्रांचा खप वाढविण्यासाठी त्यांनी चित्रपट विषयक माहिती देणारे खास स्तंभ

सुरु केले. " सत्यवादी ", " पुढारी " या वृत्तपत्रांनी चित्रपटविषयक ताज्या घडामोडी वृत्तपत्रातून देण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर ग. रं. भिडे यांनी चित्रपटांच्या बातम्या व माहिती देणारे " सिनेमासृष्टी " हे मासिक संपादित करण्यास सुरुवात केली. [५४] अशा रितीने चित्रपटांची लोकप्रियता वृत्तपत्रांच्या व्यावसायिक यशास कांही प्रमाणात कारणीभूत ठरु लागली.

कोल्हापूरच्या छत्रपतीनी यास पदोपदी प्रोत्साहनच दिले. छत्रपती राजाराम महाराज चित्रपट निर्मिती क्षेत्रात उतरले आणि " आकाशवाणी " " विलासी ईश्वर " सारख्या चित्रपटांची निर्मिती केली. [५५] बाबूराव पेंटर, भालजी पेंढारकर, बाबूराव पेंढारकर, व्ही. शांताराम यांना तर चित्रपट निर्मितीच्या सर्वांगाचे ज्ञान होते. निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, संकलक, लेखक या सर्व भूमिकेतून केलेले त्याचे योगदान मोलाचे ठरते. ख-या अर्थाने चित्रपट विश्वाचा पाया यांनीच घातला. " सिंहगड ", " अयोध्येचा राजा ", " मीठ भाकर ", " सैरंध्री " यासारख्या अनेक कलात्मक चित्रपटांची निर्मिती करुन त्यांनी स्वत:चे व पर्यायाने कोल्हापूरचे नांव अजरामर केले.

लो. टिळकांनी बाबूराव पेंटर यांना " तुम्ही जालियनवाला बागेतील प्रसंगावर चित्रपट काढा, तो देशभर दाखविल्यास आमच्या शंभर लेखांनी जे काम व्हायचे नाही ते तुमच्या एका चित्रपटाने होईल " [५६] असे सांगितले. या उद्गारातूनच त्यांनी बाबूराव पेंटर यांच्या चित्रपट निर्माता म्हणून यशाची पावती दिली. त्याचबरोबर करमणुकीचे व प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून चित्रपटाचे महत्व दिसून येते. तत्कालिन सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या मर्यादा लक्षात घेता, कोल्हापूर संस्थानातील चित्रपटांचा

विकास उल्लेखनीय मानावा लागेल.

ज्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या हिंदी व मराठी चित्रपटात महत्वाचे योगदान दिले आणि चित्रपटांची लोकप्रियता कळसास नेऊन पोहचविली, अशा लता मंगेशकर, राज कपूर, सुधीर फडके, सी. रामचंद्र, ग. दि. माडगुळकर, माने प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, राजा परांजपे, दुर्गा खोटे, शोभना समर्थ, चंद्रकांत, सुर्यकांत, सुलोचना, मा. विठ्ठल, शांता आपटे, जयशंकर दानवे, वसंत शिंदे या सर्वांचा चित्रपट विश्वाशी प्रारंभिक संबंध / संपर्क कोल्हापूरात आला. इतकेच नव्हे तर"गांधी" चित्रपटाकरीता " ऑस्कर " पारितोषिक मिळाल्याने प्रसिध्दीच्या झोतात आलेल्या भानू अथैय्या यांनीसुध्दा कोल्हापूरात निर्माण झालेल्या " मोहिनी " या चित्रपटात " बाल कलाकार " म्हणून काम केले होते. [५७] कोल्हापूर चित्रपटसृष्टीने विविध कलाकारांच्या रुपाने भारतीय चित्रपटसृष्टीस दिलेला ठेवा हाच कोल्हापूरचा अनमोल ठेवा व वारसा ठरावा.

संदर्भग्रंथ व तळटीपा :

१] संपा.लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोश, खंड - ५, पृ. ८२२.
२] संपा. वसंत साठे, चित्रसंपदा, पृ. ५०.
३] भिडे ग.रं., बाबा गजबर, कलामहर्षि बाबूराव पेंटर, पृ. ५४.
४] कित्ता, पृ. १६९, १७२.
५] व्ही.शांताराम, शांतारामा, पृ. ५७२
६] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७३.
७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ४१.
८] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.
९] माने डी.ए., ग्रोथ ऑफ द प्रेस इन द प्रिन्सली स्टेट कोल्हापूर फ्रॉम १९२२ टू १९४९, पृ. ५२.
१०] संपा. सुधीर फडके, चित्रशारदा, पृ. १७.
११] कित्ता, पृ. ९, १२.
१२] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १३८.
१३] श्री.अनंत माने यांची मुलाखत.
१४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ७, २५.
१५] संपा. बाळासाहेब पाटील, दैनिक सत्यवादी, दि. ११.६.४९, पृ. २.
१६] पेंढारकर भालजी, साधा माणूस, पृ. ७१.
१७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २८.
१८] कित्ता, पृ. ११, २७, ५५.
१९] पेंढारकर बाबूराव, चित्र आणि चरित्र, पृ. ११५, ११७.
२०] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६७.
२१] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. ४/११/१९३७, पृ. २४.
२२] श्री. वसंत वणकुद्रे यांची मुलाखत.

२३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ११७.
२४] कित्ता, पृ. १६४.
२५] श्री. अनंत माने यांची मुलाखत.
२६] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १३३.
२७] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ८७
२८] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ५२.
२९] कित्ता, पृ. ६६.
३०] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ११८.
३१] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १९०.
३२] श्री. अनंत माने यांची मुलाखत.
३३] श्री. वसंत वणकुद्रे यांची मुलाखत.
३४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ५७, ११९.
३५] कित्ता, पृ. १२८.
३६] कित्ता, पृ. ५३.
३७] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. २०/११/१९३४, पृ. ९.
३८] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३८, २३९.
३९] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. २५/७/१९४५, पृ. ४.
४०] पेंढारकर बाबूराव उपरोक्त, पृ. १०९.
४१] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. ११/९/१९३५, पृ. १४.
४२] संपा. वसंत साठे, उपरोग्त, पृ. १३.
४३] कित्ता, पृ. २४.
४४] कित्ता, पृ. २४, २८.
४५] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. २१/८/१९३५, पृ. १२.
४६] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. ७१.
४७] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १५२.

४८] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. १०९.

४९] बाबूराव पेंटर हे सुतार व बाळासाहेब यादव मराठा असल्याचा उल्लेख कलामहर्षि बाबूराव पेंटर या पुस्तकार सापडतो. पेंढारकर बंधू ब्राम्हण असल्याचे सौ.लीला पेंढारकरांच्या मुलाखतीतून समजते, तर व्ही.शांताराम व व्ही.अवधूत हे बंधू जैन असल्याचे श्री.वसंत वणकुद्रे यांच्या मुलाखतीद्वारा समजते. या क्षेत्रात गोपाळ कांबळे, माधव कांबळे इ. नावेदेखील आढळतात पण या व्यक्ति मागासवर्गीयांपैकी असतील असे खात्रीने सांगता येत नाही.

५०] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १५५.

५१] कित्ता, पृ. ११६.

५२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ५०.

५३] कित्ता, पृ. ५४.

५४] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ४.

५५] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १२०.

५६] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ५५.

५७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २०.



कलामहर्षि कै. बाबूराव पेंटर

कै. आनंदराव पेंटर



महाराष्ट्र फिल्म कंपनीचे शिल्पकार
आणि
मराठी चित्रपटांवर कलात्मक साज चढविणारे
**पेंटर बंधू**
यांना
मराठी बोलपट सुवर्ण महोत्सव प्रसंगी
कृतज्ञतापूर्वक अभिवादन



मराठी 'बोल'पटा युगाचे पहिले शिल्पकार डॉ. व्ही. शांताराम, बाबूराव पेंढारकर, भालजी पेंढारकर : जयप्रकाश स्टुडिओतील सेटवर.